# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय
दिनांक १३.०१.२०१९

## “ जिल्हास्तरीय रेला नृत्य स्पर्धेची अंतिम फेरी संपन्न”

→ पेठा रेला नृत्य संघ, हेडरी ठरला अंतिम विजेता.

अदिवासी समाजाचा सांस्कृतिक वारसा असलेला रेला नृत्य प्रकार जनमानसात वाढावा त्याला चालना व उत्तम असे व्यासपीठ मिळावे यासाठी मा.पोलीस अधीक्षक, गडचिरोली, श्री. शैलेश बलकवडे सो, यांच्या संकल्पनेतून रेला नृत्य स्पर्धेचे आयोजन,गडचिरोली पोलीस दलामार्फत करण्यात आले होते.

या स्पर्धेकरीता पोलीस ठाणे स्तरावर एकुण ५६० सघांनी सहभाग घेतला होता, त्या संघापैकी १० उत्कृष्ठ संघांची पोलीस मुख्यालय,गडचिरोली येथे होणा-या अंतिम स्पर्धेकरीता निवड करण्यात आली होती. आज रोजी मा.पोलीस अधिक्षक श्री.शैलेश बलकवडे सो यांच्या हस्ते उदघाटन करुन या स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.

या रेला नृत्याचे अंतिम स्पर्धेदरम्यान सहभागी १० संघांनी अतिशय सुंदर,मनमोहक, उत्साहवर्धक असे आदिवासी रेला नृत्याचे सादरीकरण केले. या १० संघातून प्रथम विजेता ठरलेल्या पेठा रेला नृत्य संघ,हेडरी या संघास २५,०००/- रू. रोख,ट्रॉफी, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवुन गौरवण्यात आले. उपविजेता ठरलेल्या आदिवासी मादरी गृह बेलगाव घाट,कुरखेडा या संघास २००००/- रुपये रोख रक्कम, ट्रॉफी,प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवुन गौरवण्यात आले तसेच तृतीय क्रमांक पटकावणा-या रावणराज नृत्य कला संघ येदरंगा,जिमलगटा यांना १५,०००/- रू. रोख,ट्रॉफी, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवुन गौरवण्यात आले. चतुर्थ स्थानाचे उत्तेजनार्थ बक्षीस लाहेरी संघ,भामरागड यांनी पटकावले. या स्पर्धेकरीता पर्यवेक्षक म्हणून श्री. निचोडकर सर, डॉ. अनिता लोखंडे,श्री.संजय धात्रक,श्री.ओमप्रकाश संग्रामे,डॉ.सुधा सेता यांनी काम पाहिले.

सर्व सहभागी संघांना मा.पोलीस अधीक्षक, गडचिरोली, श्री. शैलेश बलकवडे सो,यांचे हस्ते पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देवुन गौरवण्यात आले. सदर नृत्य स्पर्धेस सी.आर.पी. एफ १९२ बटालियनचे समादेशक श्री.सिंग सो,अपर पोलीस अधिक्षक श्री.महेंद्र पंडीत सो, डॉ.श्री.हरी बालाजी सो, श्री.अजयकुमार बन्सल सो, श्री.मोहितकुमार गर्ग सो.

उपस्थीत होते. सदर स्पर्धा यशस्वी होण्यासाठी नागरी कृती शाखेचे पो.उप.नि श्री. अतुल खंदारे व कर्मचारी, पोलीस कल्याण शाखेचे पो.उप.नि श्री.नरेंद्र पवार व कर्मचारी तसेच प्रपोगंडा शाखेचे पो.उप.नि श्री. अवधुत शिंगारे व कर्मचारी यांनी मेहनत घेतली.




प्रथम पारितोषिक देतांना